पुण्यनगरी तरुण भारत महासत्ता लोकमत

सकाळ पुढारी महाराष्ट्र

कोल्हापूर, शनिवार, ८ ऑगस्ट २०२६



|| ज्ञान,विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षणप्रसार ||

"विद्यार्थ्यांनी आपले लक्ष वैयक्तिक विकासावर केंद्रित करून आपली ज्ञान लालसा पूर्ण करून घेतली पाहिजे. स्वत:ची चारित्र्य व सत्प्रवृत्ती जपली पाहिजे चांगल्या गोष्टी समजून घेऊन त्या कृतीत आणण्याचा कसोशीने प्रयत्न केला पाहिजे.-शिक्षणमहर्षी डॉ बापूजी साळुंखे



श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूर

39वा स्मृतिदिन

# सस्नेह निमंत्रण

## शिक्षणमहर्षी डॉ.बापूजी साळुंखे यांचा ३९ वा स्मृतिदिन



**प्रमुख वक्ते : मा. श्री.विवेक सावंत**

आय.टी.तज्ज्ञ, शिक्षण तज्ज्ञ मुख्य मार्गदर्शक MKCL महाराष्ट्र नॉलेज कॉर्पोरेशन लिमिटेड,पुणे

**विषय : एआय आणि आपण**

**कार्यक्रमाचे अध्यक्ष : मा.प्राचार्य अभयकुमारजी साळुंखे**

(निमंत्रक सेक्रेटरी श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूर)

**कार्यक्रम स्थळ :**

शिक्षणमहर्षी डॉ.बापूजी साळुंखे स्मृतिभवन,ताराबाई पार्क, कोल्हापूर

**कार्यक्रम वेळ :**

शनिवार ८ ऑगस्ट २०२६, सकाळ सत्र: १०.३० ते १.०० दुपारचे सत्र: २.०० ते ४.३०

शनिवार, ८ ऑगस्ट २०२६ MY कोल्हापूर पुढारी

# विवेकानंद महाविद्यालयातील कार्यशाळेस प्रतिसाद

**कोल्हापूर :** विवेकानंद कॉलेज येथील अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष व संशोधन विकास कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'बौद्धिक संपदा हक्क, पेटंट, कॉपीराईट व ट्रेडमार्क अर्ज प्रक्रिया' या विषयावरील आंतरराष्ट्रीय कार्यशाळेला प्रतिसाद लाभला. कार्यशाळेत हेनान विद्यापीठ (चीन) येथील प्रा. शान्हू लिऊ, शिवाजी विद्यापीठाचे प्रा. डॉ. टी. डी. डोंगळे व राजाराम कॉलेजचे प्रा. डॉ. पी. यू. लांडे यांनी मार्गदर्शन केले. उद्‌घाटन सत्रात बौद्धिक संपदा हक्कांचे महत्त्व, पेटंट, कॉपीराईट व ट्रेडमार्क नोंदणी प्रक्रिया, आवश्यक कागदपत्रे, दस्तऐवजीकरण व अर्ज दाखल करण्याबाबत माहिती देण्यात आली. कार्यशाळेचे दुसरे सत्र १० ऑगस्ट रोजी होणार आहे. यात अर्ज भरण्याचे प्रत्यक्ष प्रशिक्षण दिले जाणार आहे. प्राचार्य डॉ. मिलिंद हुजरे यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. शुभांगी काळे, डॉ. संजय लठ्ठे व डॉ. बी. टी. दांगट यांनी कार्यशाळेचे संयोजन केले.

दैनिक जनप्रवास - शनिवार, दि. ८ ऑगस्ट २०२६

# विवेकानंद कॉलेजमध्ये वारली पेंटिंग एकदिवसीय कार्यशाळा

**जनप्रवास : कोल्हापूर**

विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर येथील गृहविज्ञान विभाग व अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने "वारली पेंटिंग एकदिवसीय कार्यशाळा" उत्साहात पार पडली. या कार्यशाळेत मार्गदर्शिका राजलक्ष्मी पाटील यांनी विद्यार्थ्यांना वारली पेंटिंगची विविध आकर्षक डिझाइन्स शिकविल्या. त्यांनी कुंड्या, केकचे टाकाऊ प्लायवूड, संक्रांतीचे सुगड, भिंती आदी विविध माध्यमांवर वारली पेंटिंग कशी करावी, कोणते रंग वापरावेत तसेच पारंपरिक वारली कलेचे महत्त्व याबाबत प्रात्यक्षिकासह सविस्तर मार्गदर्शन केले.

कार्यशाळेस प्राचार्य डॉ. मिलिंद हुजरे यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच समन्वयक डॉ. बी. टी. दांगट यांनी विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या कलाकृतींचे कौतुक करून त्यांना प्रोत्साहन दिले. कार्यशाळेचे प्रास्ताविक व स्वागत गृहविज्ञान विभागप्रमुख डॉ. उर्मिला खोत यांनी केले. सूत्रसंचालन श्रीमती सई पाटील यांनी केले, तर श्रीमती योगिता पाटील यांनी आभार प्रदर्शन केले.

या कार्यशाळेस विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला असून मोठ्या संख्येने विद्यार्थी व प्राध्यापक उपस्थित होते. वारली ही पारंपरिक लोककला असून तिच्या जतन व संवर्धनासाठी अशा कार्यशाळा महत्त्वपूर्ण ठरतात, असे मत उपस्थितांनी व्यक्त केले. यावेळी मान्यवरांनी विचार व्यक्त केले.